# NAGPUR CITY POLICE COMMISSIONERATE

## नागपूर शहर पोलीस आयुक्तालय

## (पोलीस वार्तापत्र)

### सायंकाळ

---

### दिनांक 19.09.2020 शनिवार

### (गुन्हे)

**1) पो.स्टे. नविन कामठी – जबरी चोरी :**

दिनांक 18.09.2020 चे 2000 वा चे सुमारास फिर्यादी सुमित नत्थुजी मेश्राम, वय 23 वर्ष, रा. चंद्रमणी नगर, तक्षक किराणा दुकानाजवळ, नागपूर याचा मित्र राहुल बोरकर याचे सोबत पो.स्टे. नविन कामठी हद्यीत अजनी गावाकडे जाणा–या रोडवर, रघु मेश्राम चे गोडावून जवळ गेला तेथे राहुल चा मित्र कलक्ष उर्फ बिटु मेश्राम सोबत शाब्दीक वाद होत असतांना फिर्यादी याने त्यांना सोडविणयाकरीता मध्यस्थी केली असता बिटु सोबत असलेले आरोपी क. 1) गौरव बढेल, वय 18 वर्ष, रा. नया गोडावून, कामठी, नागपूर, 2) सुरज मनीपाल, वय 18 वर्ष, रा. छावणी कामठी, नागपूर, 3) अनिकेत खोब्रागडे, रा. न्यु खलासी लाईन, नागपूर यांनी फिर्यादीस धक्काबुक्की केल्याने फिर्यादीचे गळयातील सोन्याची चैन किं, 40,000 रू ची खाली पडली फिर्यादीला चैन मिळाल्यानंतर आरोपीतांनी पुन्हा फिर्यादीचे अंगावर जावून फिर्यादीस झाडझुडपात ढकलुन फिर्यादीचे हातातील सोन्याची चैन जबरीने हिसकावून चोरून नेली. याप्रकरणी फिर्यादी याने दिलेल्या तक्रारीवरून पो.स्टे. नविन कामठी येथे सपोउपनि सिरसाट, 9922921165 यांनी आरोपींविरूध्द कलम 392,34 भादंवि अन्वये गुन्हा नोंदविला आहे.

**2) पो.स्टे. प्रतापनगर – चोरी :**

दिनांक 15.09.2020 चे 0700 वा ते 0945 वा दरम्यान फिर्यादी जितेन्द्र आसारामजी बसाखेत्रे, वय 33 वर्ष, रा. 125 न्यु सुभेदार ले आउट, उदय नगर नागपुर, हे इपीएस प्रा. लि. कंपणीमध्ये कार्यरत असुन ए.टी.एम चे देखभालचे काम करतात त्यांना बॅकेंतुन माहीती मिळाली की पो.स्टे प्रतापनगर हद्यीतं हिगणा टि पॉईन्ट येथील एस.बी.आय बॅकचे ए.टी. एम डाउन झाले तेव्हा फिर्यादी हे तेथे पोहचले असता ए.टी.एम सोबत कोणीतरी छेडछाड केली आहे. खाते कं. 000044011011000994 चे कार्ड धारकाने ए.टी.एम सोबत छेडछाड करून 2,13,000 रू ची रक्कम चोरी केली आहे. याप्रकरणी फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पो.स्टे प्रतापनगर येथे पोउपनि पवार, 9689628929 यांनी आरोपीविरूध्द कलम 380 भादवि अन्वये गुन्हा नोंदविला आहे.

### (अकस्मात मृत्यू)

**पो.स्टे. मानकापुर, नंदनवन, गिट्टीखदान, वाठोडा, कोराडी,**

**1) मानकापुर** – दिनांक 19.09.2020 चे 0830 वा पुर्वी पो.स्टे मानकापुर हद्यीत प्लॉट नं. 32 कीराड ले आउट, पोस्ट ऑफीस मागे, नागपुर येथे राहणा–या रिता शिशुपाल नागले, वय 35 वर्ष, यांनी आपले राहते घरी सिलींग फॅनला ओढणीच्या सहायाने गळफास लावुन आत्महत्या केली. याप्रकरणी फिर्यादी निरज हीरालाल यादव, वय 29 वर्ष यांनी दिलेल्या सुचनेवरून पो.स्टे मानकापुर येथे सपोउपनि पदमाकर धुर्वे, 9823849764 यांनी अकस्मात मृत्युची नोंद केली आहे.

**2) नंदनवन** – दिनांक 18.09.2020 चे 1700 वा चे सुमारास पो.स्टे नंदनवन हद्यीत नंदनवन झोपडपट्टी जगनाडे चौक, नागपुर येथे राहणारे संजय बबनराव पंधरे, वय 44 वर्ष, यांची प्रकृती खराब झाल्याने त्यांना उपचाराकरीता मेडीकल हॉस्पीटल येथे नेले असता डॉक्टरांनी तपासुन मृत घोषीत केले. याप्रकरणी मिळालेल्या सुचनेवरून पो.स्टे नंदनवन येथे पोउपनि भवाळ, 9922995726 यांनी अकस्मात मृत्युची नोद केली आहे.

3) गिट्टीखदान – दिनांक 18.09.2020 चे 2355 वा पुर्वी, पो.स्टे गिट्टीखदान हद्दीत बोरगाव बर्डे ले आउट, फ्लॅट नं. 26 साईमंदीर जवळ, नागपुर येथे राहणारे रूपचंद शंकर उमरे, वय 65 वर्ष यांची प्रकृती खराब झाल्याने त्यांना उपचाराकरीता मेयो हॉस्पीटल येथे नेले असता डॉक्टरांनी तपासुन मृत घोषीत केले. याप्रकरणी मिळालेल्या सुचनेवरून पो.स्टे गिट्टीखदान येथे सपोउपनि अरून नेवारे, 7447599608 यांनी अकस्मात मृत्युची नोद केली आहे.

4) वाठोडा – दिनांक 18.09.2020 चे 1930 वा चे सुमारास पो.स्टे वाठोडा हद्दीत राउत नगर जवळ एकता नगर, नागपुर येथे राहणारे नत्थु रामकृष्णा बांबल, वय 65 वर्ष, यांची प्रकृती खराब झाल्याने त्यांना उपचाराकरीता मेडीकल हॉस्पीटल येथे नेले असता डॉक्टरांनी तपासुन मृत घोषीत केले. याप्रकरणी मिळालेल्या सुचनेवरून पो.स्टे वाठोडा येथे सपोउपनि पंडीत मेश्राम, 8421664737 यांनी अकस्मात मृत्युची नोदं केली आहे.

5) कोराडी – दिनांक 18.09.2020 चे 1230 वा चे सुमारास पो.स्टे कोराडी हद्दीत शंभु नगर प्लॉट नं. 51 गणेश चौक, नागपुर येथे राहणारे लक्ष्मन हनुमंतराव कर्णेकर, वय 57 वर्ष यांची प्रकृती खराब झाल्याने त्यांना उपचाराकरीता मेयो हॉस्पीटल येथे नेले असता डॉक्टरांनी तपासुन मृत घोषीत केले. याप्रकरणी मिळालेल्या सुचनेवरून पो.स्टे कोराडी येथे पोहवा गणपती, 9673068369 यांनी अकस्मात मृत्युची नोंद केली आहे.

6) यशोधरानगर – दिनांक 16.09.2020 चे 1400 वा चे सुमारास पो.स्टे यशोधरानगर हद्दींत भिलगाव नाका नं. 2 नागपुर येथे राहणारे संतोष अशोक पानतावने, वय 43 वर्ष, यांची प्रकृती खराब झाल्याने त्यांना उपचाराकरीता मेयो हॉस्पीटल येथे भरती केले असता उपचारादरम्यान दिनांक 18.09.2020 चे 2130 वा चे सुमारास डॉक्टरांनी तपासुन मृत घोषीत केले. याप्रकरणी मिळालेल्या सुचनेवरून पो.स्टे यशोधरानगर येथे पोउपनि चव्हाण, 9923231905 यांनी अकस्मात मृत्युची नोद केली आहे.

## (ईतर)

### 1) नागपुर शहर पोलीसांकडुन विना मास्क फिरणा—या नागरीकांवर कारवाई :

नागपुर शहरात कोराना विषाणुचा प्रादुर्भाव व प्रसार झपाटयाने वाढल्याने त्यास प्रतिबंध करण्याकरीता मा. पोलीस आयुक्त, श्री अमितेश कुमार, यांचे मार्गदर्शनाखाली नागपुर शहरातील सर्व पोलीस स्टेशन व वाहतुक शाखेमार्फत आज विना मास्क फिरणा—या व्यक्तींवर तसेच वाहतुकीच्या इतर कलमान्वये कारवाई करण्यात आली.

सदर करण्यात आलेली कारवाई ही एका दिवसातील सर्वोच्च अशी कारवाई आहे. तरी सर्व नागपुरकर नागरींकाना आवाहन करण्यात येते की सार्वजनीक ठिकाणी वाहतुक करतांना किंवा वावरतांना तोंडाला मास्क लावावा, सॅनिटायझरचा वापर करावा तसेच सुरक्षित सामाजिक अंतर ठेवावे व नागपुर पोलीसांना सहकार्य करून स्वतःवर होणारी कारवाई टाळावी. (सदरची कारवाई सायंकाळी 0600 वा पर्यत ची आहे)

| | केसेस | दंड |
|---|---|---|
| पोलीस स्टेशन | 222 | 68,100 |
| वाहतुक विभाग | 34 | 6,800 |
| एकुण | 256 | 74,900 |

### 2) गुन्हे शाखा युनिट क्रं. 4 ची कारवाई :

दिनांक 18/09/2020 रोजीचे 18/00 वा चे सुमारास गुन्हेशाखा, युनिट क्रमांक 04 चे प्रभारी वरीष्ठ पोलीस निरीक्षक अशोक मेश्राम यांना माहीती मिळाली की, पो.स्टे वाठोडा हददीत सेनापती नगर, मोकळया जागी, दिघोरी पो.स्टे वाठोडा, नागपूर शहर येथे मर्डर झाला आहे. वरीष्ठ पोलीस निरीक्षक अशोक मेश्राम यांनी क्षणाचाही वेळ न दवडता तात्काळ सपोनी चौगले व पथकासह गुन्हयाचे घटनास्थळ गाठले.

घटनास्थळी भेट देवून सर्वप्रथम मृतदेहाची ओळख पटविली असता मृतकाचे नाव यश मधुकर ठाकरे रा. संजयगांधी नगर झोपडपटटी असे असल्याचे समजले. सदर मृतक हा पोलीस स्टेशन हुडकेश्वर येथे दाखल अपराध क्रमांक 212/2020 कलम 395,336,504,506 भादवि मधील आरोपी

असल्याने त्या बाबत अधिक माहीती काढून नमूद पथकाने अतितात्काळ मृतकाचे घर गाठून महत्वाची माहीती संकलीत केली. यातील पथकास माहीती प्राप्त झाली की, मृतक यश ठाकरे यास मागील 4 ते 5 दिवसांपासून कौन बनेंगा करोडपती मधून फोन येत असून त्याबाबत त्यास पैसे मिळणार होते त्या करीता मृतकाचे मित्र इम्तीयाज अली व साथीदार शेख आसीम उर्फ गोलू हे सतत मृतकासोबत राहत होते. मृतक यश ठाकरे व त्याचे हे दोघेही मित्र नशेच्या गोळया खात होते. मृतक व मृतकांचे हे दोघे मित्र यांचेमध्ये कौन बनेंगा करोडपती येथून मिळणारे पैश्याचे वादावरून 2 ते 3 दिवसांपुर्वी आपसात झगडा भांडण झाले होते व घटनेचे पुर्वी देखील मृतक त्याचे याच मित्रांसोबत त्याचे स्प्लेंडर गाडीवर ट्रिपल सिट गेला होता. याच माहीतीचे आधारे नमूद पथकाने गुन्हयातील आरोपीतांचे नावे निष्पन्न करून आरोपीतांचे शोधात गुप्त बातमीदार नेमले. नमूद पथक आरोपीतांचे शोधात असतांना पथकामध्ये कार्यरत सपोउपनि बटटूलाल पांडे यांना दिनांक 18/09/2020 रोजीचे रात्री गुन्हयातील आरोपीतांविषयी गुप्त माहीती मिळाली की, दोन्ही आरोपी हे मोमीनपुरा, बकरामंडी परीसरात अंधारामध्ये लपून बसले आहे व ते फरार होण्याचे तयारीत आहे.

युनिट प्रभारी वरीष्ठ पोलीस निरीक्षक श्री अशोक मेश्राम यांनी पथकासह मिळालेले माहीतीचे ठिकाणी सापळा रचून आरोपी कं. 1) इम्तीयाज अली वल्द मुख्तार अली वय 21 वर्षे रा. मोठा ताजबाग, ठाकूर प्लॉट , साबीर भाई कॅसेट वाले यांचे घरी किरायाने, पो.स्टे सक्करदरा नागपूर शहर, 2) शेख आसीम उर्फ गोलू वल्द शेख रशीद वय 24 वर्षे रा. गौसीया कॉलनी, रिंगरोड, बेसा पावर हाउस झोपडपटटी, शाहीद याचे घरी किरायाने, पो.स्टे हुडकेश्वर नागपूर यांना मोमीनपूरा येथून ताब्यात घेतले. सदर आरोपीतांना युनिट कार्यालयात आणून त्यांचेकडे अधिक चौकशी केली असता त्यांनी नमूद गुन्हा केल्याची कबूली दिली.

अश्याप्रकारे पथकातील अधिकारी व कर्मचारी यांनी खुनाचा गुन्हा घडल्यापासून अवघे 4 तासांचे आत अज्ञात आरोपीतांचे नावे निश्पन्न करून आरोपीतांना पकडून त्याचे मुसक्या बांधून प्रशंसनीय कामगीरी केली आहे.

सदरची कारवाई मा. डॉ. श्री. निलेश भरणे अपर पोलीस आयुक्त (गुन्हे), मा. श्री. गजानन शिवलींग राजमाने पोलीस उप आयुक्त (डिटेक्शन), यांचे मार्गदर्शनाखाली पोनि श्री अशोक मेश्राम, सपोनि किरण चौगले, सपोउपनि बटटूलाल पांडे, पोहवा देवेंद्र चव्हाण, अजय रोडे, कृपाशंकर शुक्ला, नापोशि आशिष क्षिरसागर, सचिन तुमसरे वाहन चालक पोहवा दिपक झाडे व श्रीकांत मारोडे यांनी केली आहे.



**<u>2) शहरातील नाईट राऊंड अधिकारी बाबत :–</u>**

नागपूर शहरात आज दिनांक 19.09.2020 रोजी मा. सपोआ, (अजनी विभाग) श्री विनय मराठे, हे नाईट राऊंड करणार आहे.

पोलीस जनसंपर्क अधिकारी
नागपूर शहर